लोकसत्ता पा.न. १ दि. १२/०५/२०२३

आमदार अपात्रतेचा मुद्दा पुन्हा विधानसभा अध्यक्षांकडे | सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे सरकार सुरक्षित | राज्यपालांच्या भूमिकेवर परखड ताशेरे

# शिंदेंना सत्ता, ठाकरेंना बळ!

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्यास नकार देतानाच त्याबाबत निर्णय विधानसभा अध्यक्षांनीच घ्यावा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलासा मिळाला असला, तरी सत्तांतराच्या घडामोडींदरम्यान राज्यपालांनी केलेल्या हस्तक्षेपावर ताशेरे ओढतानाच 'उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला नसता तर त्यांना मुख्यमंत्रीपदी पुनर्स्थापित करण्याचा विचार केला असता' असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे शिंदे यांचे सरकार सुरक्षित राहिले असले तरी, सर्वोच्च न्यायालयाने सत्तासंघर्षावर दिलेल्या निकालाने उद्धव ठाकरे यांना राजकीयदृष्ट्या बळ मिळाले आहे.

हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांसह विधानसभा अध्यक्ष आणि निवडणूक आयोग यांनी घेतलेल्या भूमिकांवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याच वेळी या खटल्याच्या केंद्रस्थानी असलेल्या नबाम रेबिया निकाल प्रकरणातील त्रुटींवर बोट ठेवत त्याबाबत फेरविचार करण्यासाठी मोठ्या घटनापीठाची नियुक्ती करण्याची घोषणाही (पान ८ वर)

शिंदे गट, ठाणे




ठाकरे गट, मुंबई



राज्यातील सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी निकाल दिल्यानंतर शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी ठाणे येथे, तर उद्धव ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी दादरच्या शिवसेना भवनासमोर आपापल्या परीने निकालाचा अर्थ लावून जल्लोष केला.

"ठाकरे यांनी बहुमत गमावल्याचे मानण्यासाठी तसेच त्यांना विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यास सांगण्यासाठी कोश्यारींकडे वस्तुनिष्ठ कारण नव्हते. मात्र ठाकरे यांनी बहुमत चाचणीला सामोरे न जाता राजीनामा दिल्यामुळे पूर्वस्थिती पुन्हा केली जाऊ शकत नाही.
- सर्वोच्च न्यायालय





विशेष पाने / ८,९


## पुढे काय?


- न्यायालयाच्या आदेशानंतर एकनाथ शिंदेंसह १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांना 'वेळेत' घ्यावा लागणार आहे. हे करताना पक्षाची मूळ घटना, अटी आणि नियम विचारात घ्यावे लागतील.
- भरत गोगावले यांची पक्षप्रतोद म्हणून केलेली निवड बेकायदा ठरवण्यात आली आहे. प्रतोद नेमण्याचा अधिकार पक्षसंघटनेचा असल्याचे न्यायालयाने म्हटले. त्यामुळे 'आम्हीच मूळ पक्ष' असल्याचा दावा करून शिंदे गट गोगावले यांची त्या पदावर पुन्हा नियुक्ती करण्याची शक्यता आहे.
- निवडणूक आयोगाने आमदारांच्या संख्येवर विसंबून राहून शिंदे गटाला मान्यता दिल्याचे न्यायालयाने म्हटले. या निर्णयात हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला असला तरी पूर्वलक्ष्यी प्रभावाने तो लागू होत नाही, असेही म्हटले. सुनील प्रभू हेच पक्षप्रतोद असल्याचे सांगताना ठाकरे गट हाच मुद्दा पुढे करू शकेल.
- सत्तांतर प्रक्रियेतील राज्यपालांच्या हस्तक्षेपावर घटनापीठाने ताशेरे ओढले. यामुळे राज्यपालांच्या आडून केल्या जाणाऱ्या राजकारणाला वचक बसेल.
- नबाम रेबिया खटल्याच्या निकालातील विधानसभा अध्यक्षांच्या अधिकारांशी संबंधित मुद्दा मोठ्या घटनापीठाकडे सोपविण्यात आला आहे. त्यामुळे अध्यक्षांचे अधिकार 'गोठवून' पक्षांतरे घडवून आणण्याच्या पद्धतीला शह बसू शकतो.



बाळासाहेब ठाकरे यांच्या भूमिकेचा, विचारांचा आदर केला आहे. २०१९ ची निवडणूक युतीने लढवली होती. त्यानंतरही मविआ सरकार स्थापन केले होते, तेव्हा नैतिकता कुठे गेली होती? - **एकनाथ शिंदे**, मुख्यमंत्री

हे सरकार न्यायालयाने घटनात्मक ठरवले आहे. निकालाने लोकशाहीचा विजय झाला आहे. मविआच्या मनसुब्यावर पाणी फिरले आहे.
- **देवेंद्र फडणवीस**, उपमुख्यमंत्री





राजीनामा देण्याचा निर्णय कायदेशीरदृष्ट्या चुकला असेल, मात्र नैतिकदृष्ट्या योग्य होता. शिंदे, फडणवीसांमध्ये नैतिकता शिल्लक असेल, तर त्यांनी राजीनामा द्यावा. - **उद्धव ठाकरे**, पक्षप्रमुख, शिवसेना (उद्धव बाळास[illegible] ठाकरे)

CamScanner

CamScanner

लोकसत्ता पु. पा. न. १

# ओला-सुका कचरा वर्गीकरणाकडे पाठ

## पालिकेचे पुन्हा नागरिकांना आवाहन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** शहरात ओला-सुका कचरा याची विल्हेवाट लावताना अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी ओला-सुका कचऱ्याचे वर्गीकरण करण्याचे आवाहन पालिकेने केले होते. मात्र अजूनही शहरात ओला व सुका कचरा एकत्रितरीत्या जात असल्याने या वर्गीकरणाकडे नागरिकांनी पाठ फिरवली आहे.

### पुन्हा पालिकेची जनजागृती मोहीम

शहराची स्वच्छता राहावी यासाठी विविध ठिकाणच्या सोसायट्या, नागरी वस्त्या, शाळा-महाविद्यालयीन ठिकाणे अशा सर्व ठिकाणी जाऊन कचऱ्याचे वर्गीकरण व स्वच्छतेविषयीचे प्रबोधन करण्यात येत असल्याची माहिती पालिकेने दिली आहे. आतापर्यंत शंभरहून अधिक ठिकाणी बैठका घेतल्या आहेत. तर ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी सुमारे २० हजार कचराकुंड्याही खरेदी केल्या आहेत.



वसई, विरार शहरात विविध ठिकाणच्या भागातून दैनंदिन कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे. आता जवळपास ७०० **(पान ४ वर)**

# ओला-सुका कचरा वर्गीकरणाकडे पाठ

**(पान १ वरून)**ते ८०० मॅट्रिक टन इतका कचरा गोळा होत आहे.

परंतु या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेचा प्रकल्प नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. तर दुसरीकडे ओला व सुका कचरा याचे योग्यरीत्या वर्गीकरण होत नाही. कचरा वर्गीकरण करण्यासाठी पालिकेने ठिकठिकाणी हिरव्या व निळ्या रंगाच्या कचराकुंड्याही ठेवल्या आहेत. मात्र अजूनही ओला व सुका असे कचऱ्याचे वर्गीकरण न करताच सर्व कचरा एकत्रित करून दिला जाऊ लागला आहे.

### दररोज २०० ते २५० मॅट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया

कचराभूमीवर मागील काही वर्षांत विल्हेवाट लावण्यासाठी प्रकल्प न उभा केल्याने समस्या अधिकच गंभीर बनली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी पालिकेने पुढाकार घेतला असून सद्यःस्थितीत दररोज २०० ते २५० मॅट्रिक टन इतक्या जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावली जात आहे. इतर प्रकल्पही लवकरच सुरू करून कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम जलद गतीने राबविले जाणार आहे.

लोकसत्ता पु. पा. न. ३

# चोरीच्या गुन्ह्यातील जप्त केलेला लाखोंचा मुद्देमाल नागरिकांना सुपूर्द

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरार, मांडवी, पेल्हार पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांतील हस्तगत केलेला एकूण ५ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल पीडितांना परत करण्यात आला. विरार पोलिसांनी २८ गुन्ह्यांची उकल केलेली आहे.

या गुन्ह्यातील आरोपींकडून सोन्याचांदीचे दागिने, किमती मोबाइल फोन, कार टेप, दुचाकी चारचाकी वाहने, सायकल असा एकूण ३२ लाख ८१ हजार रुपये किमतीचा माल याशिवाय वेगवेगळ्या कंपन्यांतून चोरलेला २६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे. पेल्हार पोलीस एकूण २० गुन्ह्यांची उकल करून १२ गहाळ मोबाइलचा शोध घेऊन एकूण १२ लाखांहून अधिक रकमेचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. मांडवी पोलिसांनी ५ गुन्ह्यांची उकल करून गुन्ह्यातील आरोपीकडून एकूण १ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बुधवारी संध्याकाळी मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान पीडितांना उपरोक्त मुद्देमाल पोलिसांनी कायदेशीर बाबींची पूर्तता करून परत करण्यात आला.

पोलीस उपायुक्त सुहास बावचे, साहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे (विरार) वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत लब्धे (पेल्हार) वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल वाघ ( मांडवी) यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

CamScanner

दि. १२/०५/२०२३

लोकसत्ता पु. पा. न. १

# कर्णकर्कश सायलेन्सरने नागरिक हैराण

## आठवडाभरात ४० दुचाकीस्वारांवर वाहतूक पोलिसांची कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**



> आता कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर लावून फिरतात त्यांच्यावर कारवाई सुरू केली आहे. ही कारवाई आणखीनच तीव्र केली जाईल.
> - **विनोद जाधव**, सहायक पोलीस निरीक्षक, वाहतूक विभाग, वसई

**वसई :** कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर व हॉर्न बसवून दुचाकी चालविल्या जात असल्याने नागरिकांना त्याचा त्रास होतो. अखेर अशा दुचाकीचालकांना आवर घालण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उचलला आहे. आठवडाभरात ४० कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर लावणाऱ्या दुचाकीस्वारांवर कारवाई केली आहे.

वसई विरार शहरात काही दुचाकीचालकांनी त्यांच्या दुचाकीच्या सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर बसविले आहेत, तर काहींनी हॉर्नमध्येही बदल केला आहे. दिवसेंदिवस दुचाकी वाहने मॉडिफाय व त्यात बदल करून चालविण्याची क्रेझ वाढत आहे.

रस्त्यावरून जेव्हा अशा प्रकारच्या दुचाकी धावतात तेव्हा त्यातून कर्णकर्कश आवाज बाहेर पडतो. यामुळे ध्वनी प्रदूषण तर होतेच; परंतु रस्त्यावरून ये-जा करणारे नागरिक व रस्त्याजवळ राहणारे नागरिक यांना याचा त्रास सहन करावा लागतो. आठवडाभरातच शहरात ४० कर्णकर्कश आवाज करणाऱ्या दुचाकीस्वारांवर कारवाई करून त्यांच्याकडून ४० हजारांचा दंड वसूल केला असल्याची माहिती वाहतूक विभागाचे सहायक पोलीस निरीक्षक विनोद जाधव यांनी दिली आहे.

लोकसत्ता पु. पा. न. १

# राज ठाकरे आज वसईत

**वसई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे शुक्रवारी एक दिवसाच्या वसई आणि भाईंदर दौऱ्यावर येत आहेत. कार्यकर्त्यांच्या भेटी, पदाधिकारी मेळावे आदी दौऱ्याचे स्वरूप आहे.

ठाणे, पालघर जिल्ह्यात संघटना मजबूत करण्यासाठी ठाकरे यांनी दौरे आयोजित केले आहेत. शुक्रवारी ते भाईंदर आणि वसईचा दौरा करणार आहे. भाईंदरच्या इंद्रा सभागृहात विधानसभानुसार कार्यकर्त्यांच्या बैठका घेण्यात येणार आहेत. दुपारी १२ वाजता हेमंत सावंत यांच्या कार्यालयाचे उद्घाटन होईल. दुपारी २ वाजता नालासोपारा येथून वसई दौऱ्याला सुरुवात होईल. दुपारी पावणेतीन वा. वसंत नगरी येथील रिजन्सी हॉटेलमध्ये कार्यकर्त्यांच्या बैठका, संध्याकाळी ५ वाजता प्रफुल्ल ठाकूर यांच्या कार्यालयाचे उद्घाटन, तर ६ वाजता गोखिवरे येथील पक्ष कार्यालयास भेट देतील.

लोकसत्ता पु. पा. न. ४

# महिलेकडून तरुणाला सव्वा लाखांचा गंडा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** टॅरो कार्डच्या साहाय्याने भविष्य सांगणाऱ्या एका महिलेने तरुणाला सव्वा लाखांचा गंडा घातला आहे. काशिमीरा येथील एका हॉटेलमध्ये नेऊन पैशांचा पाऊस पाडणार असे सांगून तरुणाला प्रसाद देऊन बेशुद्ध केले आणि त्याचे पैसे लंपास केले. काशिमीरा पोलिसांनी याप्रकरणी महिलेविराधात गुन्हा दाखल केला आहे.

मीरा रोडच्या पूनम गार्डन येथे राहणारे धीरेंद्र तिवारी (३३) यांचे मद्य विक्रीचे (बीअर शॉप) दुकान आहे. त्याची ओळख नायगावमधील खुशबू पांडे या महिलेशी झाली. खुशबू पांडे ही कार्डावरून भविष्य (टॅरो कार्ड रीडर) सांगते. काशिमीरा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार उद्योगक्षेत्रात ओळखी असल्याचे सांगून तिने तिवारी याचा विश्वास संपादन केला होता. दरम्यान ४ मे रोजी तिने पैशांचा पाऊस पाडणार असे सांगून तिवारी याला काशिमीरा येथील मिरॅकल हॉटेलमध्ये नेले. तेथे प्रसादामध्ये गुंगीचे औषध टाकून त्याला बेशुद्ध केले आणि तिवारीकडील १ लाख ३५ हजार रुपये लंपास केले.

तिवारी याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. रुग्णालयातून आल्यानंतर त्याने काशिमीरा पोलीस ठाण्यात खुशबू पांडे हिच्या विरोधात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी पांडे हिच्या विरोधात कलम ३२८ आणि ४२० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पांडे ही ब्लॅक मॅजिक (काळी जादू) करत असल्याचा दावा केला होता तसेच बड्या लोकांच्या ओळखी असल्याचे सांगून माझी फसवणूक केल्याचे फिर्यादी धीरेंद्र तिवारी याने सांगितले.

याप्रकरणी जीवितास धोका निर्माण करणे, तसेच फसवणुकीचा गुन्हा दाखल असल्याची माहिती काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम यांनी दिली.

लोकसत्ता पु. पा. न. ४

# तरुणाची आत्महत्या

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** पत्नीच्या प्रियकराच्या जाचाला कंटाळून एका तरुणाने आत्महत्या केली आहे. याप्रकरणी विरार पोलिसांनी प्रियकराविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

विरार पूर्वेच्या कारगिल नगरमध्ये राहणाऱ्या सुशांत शेडगे (२६) या तरुणाचा गौरी नावाच्या तरुणीसोबत विवाह झाला होता. गौरीचे सुमित शेळके नावाच्या तरुणाशी प्रेमसंबंध होते. त्यावरून पती-पत्नीमध्ये वाद व्हायचे. यामुळे गौरीचा प्रियकर सुमित शेळके यांनी सुशांतला धमकावले होते. गौरीला सोडून दे अन्यथा बघून घेईन अशी धमकी दिली होती. त्यामुळे या धमकी आणि जाचामुळे सुशांत याने राहत्या घरातील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी सुशांतचा भाऊ सुदेश शेडगे याने दिलेल्या तक्रारीवरून विरार पोलिसांनी बुधवारी आरोपी सुमित शेळके याच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी कलम ३०६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

दि. १२/०४/२०२३

सकाळ पा. नं. २

# अध्यक्षांनी अपात्रतेची कारवाई ताबडतोब सुरू करा!

## ठाकरे गट आक्रमक होणार ; नार्वेकरांना निवेदन देणार

आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभेच्या अध्यक्षांनी घ्यायचा आहे, या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे ताबडतोब पालन करत कार्यवाही सुरु करण्याची मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे करणार आहेत. माझ्याच शिवसेनेचा व्हिप कायदेशीर अशी भूमिका घेणाऱ्या ठाकरे यांनी अपात्रतेची निर्णय प्रक्रिया त्वरित सुरु करा अशी मागणी करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती ज्येष्ठ नेते अनिल परब यांनी दिली. आज दिल्लीहून 'सकाळ'शी बोलताना ते म्हणाले, "अपात्रतेसंबंधी विशिष्ट कालावधीत निर्णय घ्यावा, असे स्पष्ट निर्देश निकालात आहेत. आम्हाला या प्रक्रियेतून न्याय हवा आहे अन् तो मिळावा यासाठी कोणताही कालावधी न दवडता आम्ही मागणी सुरु करू."

आज 'मातोश्री'वर निकाल आणि त्यानंतर काय करावे, याबद्दल सविस्तर चर्चा झाली. मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याच्या घटनेवर सरन्यायाधीशांनी केलेले भाष्य तसेच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केलेले मत यामुळे उद्धव ठाकरे दुखावले असल्याचे बोलले जाते. मात्र, आता याबद्दल फार विचार न करता पुढचे बघू असे मत त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

### आता विधिमंडळातील लढाई

■ सत्तेतून पायउतार झाल्यानंतर उद्धव ठाकरे सतत प्रवास करून संपर्क, सभा यावर भर देत आहेत. हे दौरे आता वाढवले जातील असेही समजते. शिवसेना आमचीच आहे अन् झुंजणे आमची वृत्ती असल्याचेही एका नेत्याने सांगितले. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर दोन दिवसांत मुंबईत परतत असून लगेचच विधिमंडळातील लढाई सुरु होईल असे 'मातोश्री'तून सांगण्यात आले.

सकाळ पा. न. ३

# जयंत पाटील यांना ईडीची नोटीस

## मनिलॉण्डरिंग प्रकरणात चौकशीस हजर राहण्याचे आदेश

मुंबई, ता. ११ : राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना ईडीने उद्या (ता. १२) चौकशीसाठी बोलावले आहे. 'आयएल अँड एफएस'मधील कथित आर्थिक अनियमिततेशी संबंधित मनी लॉण्डरिंग प्रकरणात पाटील यांना ईडीने नोटीसही बजावली आहे.



जयंत पाटील

कंपनीच्या व्यवहारांची ईडीकडून चौकशी सुरू होती. दिवाळखोरी जाहीर केली असतानाही कंपनीतून मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप होता. याप्रकरणी राज ठाकरे यांनाही नोटीस पाठवण्यात आली होती. जयंत पाटील यांच्याशी संबंधित संस्थांना 'आयएल अँड एफएस' प्रकरणातील काही आरोपी कंपन्यांनी 'कमिशन रक्कम' दिल्याचा आरोप आहे. दरम्यान, ज्या प्रकरणात मला ईडीने नोटीस बजावली आहे, त्या कंपनीसोबत माझा रुपयाचाही व्यवहार नाही, असे पाटील यांनी सांगितले.

सकाळ पु. पा. न. ३

# वसईतील पुरवठा अधिकारीपद रिक्त

## नियुक्तीसाठी मंत्री रवींद्र चव्हाण यांना काँग्रेसचे पत्र

विरार, ता. ११ (बातमीदार) : वसई तहसील कार्यालयातील पुरवठा अधिकारी रोशन कापसे यांची बदली झाल्याने ते पद अद्याप रिक्त आहे. परिणामी वसई तालुक्यातील नागरिकांची शिधापत्रिकेसंबंधीची कामे रखडली आहेत. या रिक्त जागी तातडीने नेमणूक करण्याची मागणी वसई विरार शहर युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष कुलदीप वर्तक यांनी अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे केली आहे.

वसई विरार महापालिका हद्दीतील लोकसंख्या सध्या वाढत आहे. नागरिकांना शिधापत्रिकेच्या आवश्यक कामासाठी दूरवरून वसई तहसीलदार कार्यालयात यावे लागते. नवीन अधिकारी उपलब्ध नसल्याने त्यांना हेलपाटे घालावे लागतात. यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा खर्ची होत आहे. सध्या वसई तालुक्यात केशरी शिधापत्रिकाधारक तीन लाख ८० हजार, तर सफेद शिधापत्रिकाधारक २१ हजार आणि पिवळे शिधापत्रिकाधारक ३,७१४ आहेत.

नागरिकांच्या या समस्येकडे लक्ष देण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात नायब तहसीलदार यांच्याकडे कार्यभार सोपवण्यात आला आहे. दैनंदिन कामाव्यतिरिक्त हे काम सोपवल्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त ताण पडतो. त्यामुळे नागरिकांना तिष्ठत राहावे लागते. या समस्येकडे गंभीरपणे लक्ष देऊन वसई तहसीलदार कार्यालयात पुरवठा अधिकारीपदावर नवीन अधिकाऱ्याची त्वरित नेमणूक करण्याबाबत वसई काँग्रेसचे नेते कुलदीप वर्तक यांनी केली आहे.

CamScanner

दि. १२/०५/२०२३

सकाळ पु. पा. न. १

# हत्या प्रकरणातील आरोपी सहा वर्षांनंतर जाळ्यात

## काशी-मिरा पोलिसांची वसईत कारवाई

भाईंदर, ता. ११ (बातमीदार) : काशी-मिरा भागातील एका लॉजमध्ये घडलेल्या हत्याप्रकरणातील फरार आरोपी तब्बल सहा वर्षांनी पोलिसांच्या हाती लागला आहे. पोलिसांनी त्याला विरार येथून अटक केली आहे. उसणे घेतलेले ३९ लाख रुपये परत करत नाही, म्हणून मुंबईतील गोरेगाव येथे राहणाऱ्या सचिन मोहितेट या तरुणाला २०१६ मध्ये काशी-मिरा येथील प्रिमियम लॉजमध्ये अकरा जणांनी बेदम मारहाण करून त्याची हत्या केल्याची घटना घडली होती.

हत्येनंतर सचिन मोहितेट याचा मृतदेह पालघर जिल्ह्यातील मनोर येथे सूर्या नदीच्या पुलावरून वाहत्या पाण्यात फेकून देण्यात आला होता. या प्रकरणी सफाळा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती; मात्र मुंबई पोलिसांना मोहितेट याची पैशाच्या कारणावरून हत्या झाल्याची माहिती मिळाली होती. त्यामुळे सफाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आणि हत्येचे ठिकाण काशी मिरा असल्यामुळे हे प्रकरण २०१७ मध्ये काशी मिरा पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आले.

काशी मिरा पोलिसांनी ११ पैकी नऊ आरोपींना अटक केली; परंतु प्रमोद जेना ऊर्फ नीलू व सौम्यराज खिरोद दास हे दोन आरोपी फरार झाले होते. गेल्या सहा वर्षांपासून पोलिस त्यांचा शोध घेत होते. काशी मिरा पोलिसांनी पुन्हा या प्रकरणाचा तपास सुरू केला. त्यांच्या या तपासाला अखेर यश आले असून पोलिसांनी त्याला अटक केली.

### मोबाईल क्रमांकामुळे आरोपीचा शोध

पोलिसांनी सौम्यराज याचा सध्या वापरात असलेला मोबाईल क्रमांक शोधून काढला व त्याचे तांत्रिक विश्लेषण केले. त्यामुळे सौम्यराज हा विरार येथील ग्लोबल सिटी भागात असल्याचे निष्पन्न झाले. सौम्यराज याला ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर त्याने हत्येमध्ये सहभाग असल्याची कबुली दिली. त्यामुळे त्याला अटक करण्यात आली.

सकाळ पु. पा. न. १

# राज ठाकरे आज भाईंदरमध्ये

भाईंदर, ता. ११ (बातमीदार) : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पदाधिकारी मेळावा, तसेच मध्यवर्ती कार्यालयाच्या उद्घाटनासाठी राज ठाकरे उद्या (ता. १२) भाईंदरमध्ये येणार आहेत. मनसेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा भाईंदर पूर्व येथील इंद्रवरुण सभागृहात शुक्रवारी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला राज ठाकरे उपस्थित राहणार आहेत. नवघर रस्त्यावरील बाळकृष्ण नगरमधील मनसेचे मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटनही राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, अशी माहिती मनसेचे शहर अध्यक्ष हेमंत सावंत यांनी दिली.

CamScanner

दि. १२/०५/२०२३

लोकसत्ता पु. पा. न. ४

# महिलांचा आवाज काढून फसवणूक करणारे भामटे गजाआड

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** दूरध्वनीवर महिलांचा आवाज काढून व्यावसायिकांची फसवणूक करणाऱ्या दोन अट्टल गुन्हेगारांना गुन्हे शाखे १ च्या पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या आरोपींवर विविध पोलीस ठाण्यांत फसवणुकीच्या १९ गुन्ह्यांची नोद आहे.

भाईंदरच्या नवघर येथे असलेल्या श्रीराम ज्वेलर्समध्ये रविवारी सायंकाळी एका महिला डॉक्टरच्या नावे फोन आला होता. यात महिलेने चार तोळे सोन्याच्या बांगड्यांची मागणी केली होती. या बांगड्या आपल्या 'साई आशीर्वाद' नावाच्या रुग्णालयामध्ये पाठवून द्याव्यात आणि बांगड्यांचे दोन लाख रुपये रोख घेऊन जावे, असे सराफाला सांगितले होते. याशिवाय अधिकचे पाचशेच्या नोटांचे दोन लाख रुपये पाठवून देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार दुकानातील कर्मचारी बांगड्या आणि रोख रक्कम रुग्णालयाजवळ घेऊन आला असता त्याची फसवणूक करून एक व्यक्ती तेथून पसार झाला.

या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा १ चे वरिष्ठ पोलीस अधिकारी अविराज कुराडे यांच्या पथकाने सुरू केला होता. महिलेच्या आवाजात आलेला फोन हा बनावट असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार तांत्रिक बाबींच्या मदतीने पोलिसांनी आरोपी मनीष आंबेकर आणि अन्वर शेख यास अटक केली. हे आरोपी महिलांचा आवाज काढून मोठ्या व्यावसायिकांची फसवणूक करत होते. या आरोपींविरोधात मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांत १९ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सामना पा. न. ८

## महिलेचा आवाज काढून सराफाला लावला चुना

**भाईंदर :** महिलेचा आवाज काढून सराफाला चुना लावल्याची घटना भाईंदरमध्ये घडली आहे. याप्रकरणी काशिमीरा गुन्हे शाखेने दुकलीला बेड्या ठोकल्या. मनीष आंबेकर आणि अन्वर शेख अशी अटक आरोपींची नावे असून या दोघांनी महिलांचे आवाज काढून १९ नागरिकांची फसवणूक केली आहे. त्यांच्यावर विविध पोलीस ठाण्यात नऊ गुन्हे दाखल आहेत.



भाईंदर पूर्वेतील श्रीराम ज्वेलर्सच्या मालकांना रविवारी फोन आला होता. समोरील महिलेने आपण डॉक्टर बोलत असून सोन्याच्या बांगड्या बनवायच्या आहेत असे सांगितले. त्यासाठी दोन लाख रुपये अॅडव्हान्स देते असे सांगून जवळच्या रुग्णालयाजवळ बोलावले. सोबत रुग्णालयाच्या कामकाजासाठी सुट्टे दोन लाख रुपये पाठवण्यासदेखील सांगितले. त्यानुसार ज्वेलर्स मालक रुग्णालयाजवळ गेले असता एकाने सुट्टे दोन लाख रुपये घेतले आणि मालकाला बांगडीचे मोजमाप घेऊन येण्यासाठी सांगितले. त्यानंतर मोजमाप घेऊन ते पुन्हा रुग्णालयाजवळ आले असता तो व्यक्ती त्या ठिकाणी दिसला नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सराफाने नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलीसांनी तपास करून दोघांच्या मुसक्या आवळल्या.

सामना पा. नं. ८

## पतीची आत्महत्या

**विरार :** पत्नीच्या प्रियकराच्या जाचाला कंटाळून पतीने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी विरार पोलिसांनी प्रियकराविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कारगीलनगर येथील सम्राट अपार्टमेंटमध्ये राहणारा सुशांत शेडगे याचा गौरीसोबत विवाह झाला. मात्र गौरीचे सुमित शेळके या तरुणाशी प्रेमसंबंध होते. यावरून पती-पत्नीमध्ये नेहमी वाद व्हायचे. यामुळे सुमितने सुशांतला अनेकदा धमकावले होते. याला कंटाळून अखेर गळफास घेत सुशांतने जीवन संपवले.

सामना पा. नं. ८

## महिलेचा मृत्यू

**नालासोपारा :** पाणी भरत असताना विजेचा झटका लागून महिलेचा मृत्यू झाल्याची घटना वसईत घडली आहे. मायादेवी जयस्वाल असे मृत महिलेचे नाव आहे. चिंचोटी येथील आशानगर चाळीत राहणाऱ्या मायादेवी या घरासमोर मोटार लावून पाणी भरत होत्या. यावेळी त्यांना विजेचा झटका लागला. त्यांना त्वरित रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

CamScanner

दि. १२/०५/२०२३

लोकमत पा. न. ५

## हॉटेलात क्रिकेटवर सट्टा चालवणाऱ्या आठ जणांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरच्या हॉटेलमध्ये गुजरातमधील सट्टेबाज येऊन क्रिकेटवर सट्टा चालवत असल्याचे नवघर पोलिसांच्या छाप्यात उघडकीस आले. यात सट्टेबाजांसह हॉटेलच्या व्यवस्थापकांना अटक केली असून, चालक- मालकांना आरोपी केले आहे.

नवघर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय पवार यांना आझादनगरच्या 'द क्राउन' हॉटेलवर सट्टा खेळवला जात असल्याचे कळले. त्यानुसार सहायक निरीक्षक योगेश काळे व गणेश केकाण यांच्यासह नवनाथ घुगे, भूषण पाटील, तंत्रज्ञ करण शाह आदींच्या पथकाने छापा घातला. छाप्यात फरहान चौरावाला (२७), चिराग रावल (४०), नजीम लुहार (२६), पार्थ बारोट (३३), सनाऊल दाढी (२३), मोईन सलीम घाँची (२४), वसीम घाँची (२९) व राकीब दाढी (२२) यांना व हॉटेलचे व्यवस्थापक संजय शेट्टी (५०) व अँथोनी डिसोजा (२८) यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले.

लोकमत पा. न. २

# पवार म्हणाले, चेहरा नंतर ठरवू, आधी एकत्र येऊ

## नितीश कुमार, तेजस्वी यादव यांनी घेतली पवार, ठाकरेंची भेट





बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव गुरुवारी मुंबईच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली.

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** देशात लोकशाही वाचवण्यासाठी एकत्रित येण्याची आवश्यकता आहे. विरोधकांनी एकत्र राहणे गरजेचे आहे. सगळे मिळून काम करणे हे जास्त महत्त्वाचे असून आम्ही एकत्र काम करू, चेहरा नंतर ठरवला जाईल, अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना मांडली.

बिहारचे मुख्यमंत्री आणि जनता दल युनायटेडचे नेते नितीश कुमार, उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी गुरुवारी मुंबईत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची सिल्व्हर ओक येथे भेट घेतली. या भेटीनंतर पवार पत्रकारांशी बोलत होते. त्यापूर्वी मातोश्रीवर जाऊन नितीश कुमार यांनी शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचीही भेट घेतली.

राज्यपालांची निवड करताना जी काळजी घ्यावी लागते ती काळजी न घेता जाणीवपूर्वक तिथल्या स्थानिक अन्य राष्ट्रीय विचारांचे लोकप्रतिनिधींना किंवा संस्थेला त्रास कसा होईल, ही भूमिका घेऊन या नियुक्त्या केल्यानंतर हे घडत आहे. त्याचेच उदाहरण आपण महाराष्ट्रात पाहिले, अशी टीकाही पवार यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केली. कोर्टाच्या निकालानंतर भाजपविरोधात प्रचार करणे सोपे होणार आहे, असे सांगतानाच ज्यांच्या नावाने निवडून येता त्या पक्षाचा आदेश महत्त्वाचा असतो. काही निर्णय अजून व्हायचे आहेत. त्यामुळे नैतिकता आणि भाजपचा काही संबंध आहे, असे वाटत नाही असा उपरोधिक टोलाही पवार यांनी लगावला.

### लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र - उद्धव ठाकरे

देशात लोकशाहीची हत्या होते की काय, असे चित्र दिसते आहे. लोकशाही वाचवण्यासाठी लोकशाहीची हत्या करु इच्छितात त्यांच्या विरोधात देशप्रेमी पक्ष आणि जनता एकत्र करण्याचे आमचे प्रयत्न सुरु आहेत. ते अधिक बळकट करण्यासाठी नितीश कुमार यांनी भेट घेतल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

### देश हितासाठी एकत्र येतोय - नितीश कुमार

पूर्ण देशात जास्तीत जास्त पक्ष एकत्र यावेत, असे आमचे प्रयत्न सुरु आहेत. आज जे केंद्रात आहेत ते इतिहास बदलत आहेत. देश हितासाठी, विकासासाठी, देशात सर्व धर्मात एकता राहिली पाहिजे, यासाठी आम्ही एकत्र येत असल्याचे नितीश कुमार यांनी यावेळी सांगितले.


CS CamScanner

CS CamScanner

दि. १२/०५/२०२३

लोकमत पा. नं. ६

# आंदोलक कुस्तीपटूंनी पाळला 'काळा दिवस'



भारतीय कुस्ती महासंघाचे प्रमुख ब्रिजभूषण शरणसिंग यांच्याविरोधात निदर्शने करणाऱ्या कुस्तीपटूंनी गुरुवारी हातावर आणि डोक्यावर काळ्या पट्ट्या बांधून निषेध व्यक्त करीत काळा दिवस पाळला. विनेश फोगट, बजरंग पुनिया, साक्षी मलिक, सत्यव्रत कादियान, जितेंद्र किन्हा आणि इतर कुस्तीपटूंनी १८व्या दिवशी जंतर-मंतर येथे आंदोलनावेळी डोक्यावर आणि हातावर काळ्या पट्ट्या बांधल्या होत्या. यावेळी पहिलवानांच्या समर्थकांनीही हातावर काळ्या फिती बांधल्या.

लोकमत पु. पा. नं. १

# व्हॉट्सॲपवरून देहविक्रय चालवणाऱ्या महिलेस अटक

## अल्पवयीन मुलीसह तरुणीची सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** व्हॉट्सॲपद्वारे अल्पवयीन मुली व तरुणींचे फोटो पाठवून वेश्या व्यवसायास लावणाऱ्या उल्हासनगरमधील महिला दलालास भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेने काशीमीरा भागातून सापळा रचून अटक केली आहे. कारवाईदरम्यान वेश्या व्यवसायासाठी आणलेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीसह एका तरुणीची पोलिसांनी सुटका केली आहे.

उल्हासनगर भागातील रितू नावाची दलाल पुरुषांना व्हॉट्सॲपद्वारे अल्पवयीन मुली आणि तरुणी पुरवते. अल्पवयीन मुलींचे कौमार्यभंग करण्यासाठी ती मोठी रक्कम घेते, अशी माहिती पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांना मिळाली होती. त्यानुसार अहिरराव यांनी बोगस ग्राहकाद्वारे रितूकडे विचारणा केली. त्यानुसार ती १० मे रोजी काशीमीरा महामार्गावरील न्यू दिल्ली दरबार हॉटेल जवळ १५ वर्षांची अल्पवयीन मुलगी, तरुणीला घेऊन आली. अल्पवयीन मुलीचे कौमार्यभंग करण्याच्या बोलीवर मोबदला म्हणून मोठी रक्कम ठरवून तिने ती पैसे घेताच अहिरराव यांच्यासह उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, केशव शिंदे, सम्राट गावडे, अश्विनी भिलारे, शुभांगी मोकल यांनी तिला पकडले.

### दलाल उल्हासनगरची

तिच्याकडे चौकशी केली असता तिचे नाव कविता ऊर्फ रितू शंकर प्रजापती सिंग (वय ३०, रा. उल्हासनगर) असल्याचे निषपन्न झाले. तिच्याकडून रोख रकमेसह मोबाइल आदी हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी काशीमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात झाला आहे.

लोकमत पु. पा. नं. १





# मीरा रोडमध्ये रस्त्यात ट्रक, भाईंदरमध्ये मोटार रुतली

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** मीरारोडमध्ये रस्ता खचून ट्रक रुतल्याची, तर भाईंदरमध्ये रस्ते खोदकाम केल्याने एक मोटार रुतल्याची घटना गुरुवारी घडली. यामुळे महापालिकेच्या भोंगळ कारभारावर टीका होत आहे.

मीरारोडच्या कनकिया, सिनेमॅक्स जंक्शनजवळ गुरुवारी रस्त्याच्या मधोमध एक ट्रक रस्ता खचल्याने त्यात रुतला. खचलेल्या रस्त्यात ट्रकची चाके रुतली. भर रस्त्यात ट्रक अडकल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला. अखेर क्रेन मागवण्यात आली व त्यानंतर ट्रक बाहेर काढण्यात आला.

भाईंदर पश्चिमेस शिवसेना गल्लीजवळील मुख्य रस्त्याचे खोदकाम भूमिगत गटार वाहिनी टाकण्यासाठी केले. त्यावर टाकलेली माती बसलेली नसल्याने बुधवारी रात्री शशिकांत नगर समोर मोटार रुतून बसली. लोकांचा मोटार बाहेर काढण्याचा प्रयत्न शक्य न झाल्याने क्रेनने ती बाहेर काढण्यात आली.

CamScanner

CamScanner

लोकमत पु. पा. नं. १

दि. १२/०५/२०२३

# परिवहन ठेकेदारास आठ कोटींवर नुकसानभरपाई

## बेजबाबदार कारभाराचा पालिकेस भुर्दंड

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेतील तत्कालीन नगरसेवक यांचा आडमुठेपणा आणि प्रशासनाचा बेजबाबदारपणा यामुळे पूर्वीच्या परिवहन ठेकेदारास आठ कोटी ६५ लाखांची नुकसानभरपाई देण्याच्या लवादाच्या आदेशामुळे बेजबाबदार नगरसेवक व अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्यासह त्यांच्याकडून हा खर्च वसूल करण्याची मागणी होत आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेला तत्कालीन केंद्रातील काँग्रेस सरकारकडून नागरिकांच्या सुविधेसाठी ५० बस या जेएनएनआरयूएममधून ५० टक्के अनुदानातून मिळाल्या होत्या. २०१० साली पालिकेने त्या बस चालविण्यासाठी कॅस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर या ठेकेदारास ठेका दिला होता. बसखरेदीचे ५० टक्क्यांप्रमाणे चार कोटी १४ लाख रुपये ठेकेदाराने भरले होते.

पूर्वीच्या महालक्ष्मी इन्फ्रा या ठेकेदाराच्या जुनाट बसही कॅस्ट्रलच्या माथी मारण्यात आल्या होत्या. बससेवा चालविण्याचा सर्व खर्च कॅस्ट्रलने करायचा. शिवाय पालिकेला प्रति किमी एक रुपया रॉयल्टी देण्याचा एकूण १० वर्षांचा करार होता. मात्र, तत्कालीन नगरसेवकांनी बस डेपोसाठी जागा दिली नाही तसेच नियमाप्रमाणे तिकीट दरवाढ करून दिली नाही. विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना भाड्यात दिलेल्या सवलतीची रक्कमही ठेकेदारास दिली नाही.

### कशाची द्यावी लागणार भरपाई?

विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक सवलत फरक : तीन कोटी ३७ लाख

विलंबाने झालेली तिकीट दरवाढ चार कोटी ७० लाख

बस खरेदीपोटी भरपाई ५८ लाख ७४ हजार

नगरसेवक व अधिकाऱ्यांच्या नियमबाह्य, मनमानी व भ्रष्ट कारभारामुळे हा आठ कोटी ६५ लाखांचा भुर्दंड आणि वकिलांची लाखोंची फी करदात्या जनतेच्या पैशातून का दिली जावी? बस भंगारात गेल्या त्याचा कोट्यवधींचा भुर्दंड वेगळाच आहे. त्यामुळे संबंधित बेजबाबदार नगरसेवक व पालिका अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्याकडून वसुली केली गेली पाहिजे.

- कृष्णा गुप्ता, अध्यक्ष, सत्यकाम फाउंडेशन

प्रशासनानेही नगरसेवकांच्या मनमानीसमोर नमते घेत बेजबाबदारपणा दाखविला. २०१५ मध्ये महापालिकेने मुदतीच्या पाच वर्षे आधीच कॅस्ट्रलचा ठेका रद्द करून नवीन बस ठेकेदार नेमला, तर पालिकेच्या विरोधात कॅस्ट्रलने फेब्रुवारी २०१५ मध्ये लवादाकडे दाद मागितली. ठेकेदाराने नुकसानभरपाई म्हणून ४० कोटी ५० लाखांची मागणी केली होती. लवाद म्हणून नियुक्त ज्येष्ठ वकील सुधीर नारगोळकर यांनी कॅस्ट्रल ठेकेदारासही पालिकेला एक कोटी ७७ लाख रुपये देण्याचे आदेश दिले आहेत.

पुढारी पा. नं. ५

# ठाकरे गटाच्या मागे संभाजी ब्रिगेड उभी राहणार

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**



राज्यात विरोधी पक्षातील नेत्यांना, कार्यकर्त्यांना संपवण्याचा डाव सुरू आहे. ठाणे जिल्ह्यातही विरोधकांवर खोटेनाटे आरोप करून त्यांना धमकी दिली जात आहे तसेच खोट्या केसेस दाखल करून विचारावर घाला घातला जात असल्याच्या विरोधात संभाजी ब्रिगेड आता रस्त्यावर उतरणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक संतोष शिंदे यांनी दिली. तसेच ठाण्यात उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या मागे खंबीरपणे उभी असल्याचा विश्वास संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

ठाण्यात जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी वरिष्ठ नेत्यांनी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या आदेश दिले. राज्यातील प्रत्येक समाजासाठी तळमळ करणारे कार्यकर्ते म्हणून संभाजी ब्रिगेडकडे बघितले जाते. शिवसेनेत फूट पडल्यानंतर संभाजी ब्रिगेडने उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला जाहिर पाठिंबा दिला आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात संभाजी ब्रिगेड वाढवण्यावर भर दिला जाणार असून गुरुवारच्या बैठकीत अनेक नियुक्त्या करण्यात आल्या.

मुंबई, पुणे, नगर, नाशिक, नागपूर या भागातून ठाणे शहरात अनेक नागरिक वास्तव्य करत असून संभाजी ब्रिगेड आपल्या दारी या मोहिमेअंतर्गत काम सुरू करा, अशी सूचना ही यावेळी शिंदे यांनी दिल्या. तसेच आगामी निवडणूकीत संभाजी ब्रिगेड ठाणे जिल्ह्यासह शहरात ठसा उमटवणार असल्याने त्या दृष्टीनं कामाला सुरुवात करत ठाणे शहरात इच्छुकानी अजून तयारी करावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले. यावेळी संघटक मनोज गायकवाड, ठाणे जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, राज्यात हिटलरशाही सुरू आहे. त्याच्या विरोधात आवाज उठवणार आहोत. तसेच प्रामाणिक कार्यकर्त्यांची गळचेप केली जात असून खारघर प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून राज्यकर्त्यांनी राजीनामा द्यावा. तसेच आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी पुरस्कार परत करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. तर या प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी संतोष शिंदे यांनी केली आहे.

लोकमत पु. पा. नं. २

# भाईंदरमध्ये विद्यार्थ्याची आत्महत्या; बंद घरात सापडला कुजलेला मृतदेह

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेस बंद घरात कुजलेल्या अवस्थेतील तरुणाचा मृतदेह सापडला, तर एका विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

दुसऱ्या घटनेत भाईंदरच्या बालाजी नगरमध्ये तिरुपती कॉम्प्लेक्समध्ये राहणाऱ्या गौरव बाहेती (२३) या इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्याने बुधवारी रात्री घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. गौरव हा विलेपार्ले येथील महाविद्यालयात शिकत होता. काही काळापासून तो मानसिक तणावात असल्याने त्याच्यावर उपचार सुरु करण्यात आले होते. त्यातच त्याने आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. भाईंदर पोलिसांनी घटनेची नोंद करून तपास सुरु केला आहे.

महाराणा प्रताप मार्गावरील वाघाणी विहार इमारतीतील सदनिकेतून दुर्गंधी येत असल्याने रहिवाशांनी भाईंदर पोलिस आणि महापालिकेच्या अग्निशमन दलास गुरुवारी कळविले. त्यानुसार पोलिस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी घराचा दरवाजा तोडला. आतमध्ये कुजलेल्या आणि नग्न अवस्थेतील अमित रेळे (वय ३५) या रहिवाशाचा मृतदेह पडलेला होता.

रहिवाशांनी सांगितले की, अमित व त्याची आई या घरात राहत होते. काही महिन्यांपूर्वी अमितच्या आईचा मृत्यू झाल्याने तो एकटाच होता. एकटेपणा वा मानसिक तणावामुळे त्याने आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात असला, तरी पोलिसांनी त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. त्याचा अहवाल आल्यावर वस्तुस्थिती स्पष्ट होईल.

CS CamScanner

CS CamScanner

दि. १२/०५/२०२३

पुण्य नगरी पु. पा. न. १

# व्हीआयपी क्रमांकाच्या आमिषाने फसवणूक

## सायबर गुन्हे शाखेकडून एकाला अटक

**। मीरा रोड :** मीरा रोड येथे राहणाऱ्या मोबाईल सिम कार्ड विक्रेत्याने विरार येथे राहणाऱ्या एका व्हीआयपी मोबाईल नंबरचे सिम कार्ड देण्याचे सांगून त्याची ६४ हजारांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी सायबर गुन्हे कक्षाने तपास करून फसवणूक करणाऱ्यास अटक केली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत राहणारे घनश्याम सिंग यांना त्यांचे व्हॉट्सॲपवर व्हीआयपी मोबाईल क्रमांक देतो असे सांगून ६४,००० रुपयांची फसवणूक केल्याबाबत सायबर गुन्हे शाखेत तक्रारी अर्ज करण्यात आला होता. तसेच अर्नाळा पोलीस ठाण्यात २९ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही तक्रार प्राप्त होताच तक्रारदार यांची फसवणूक झालेल्या रकमेची सायबर सेफ पोर्टलवर माहिती घेतली असता, ती रक्कम संशयित डीसीबी बँक व मोबाईल क्रमांकाची माहिती मिळण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला. मिळालेल्या पत्त्यावर जाऊन खात्री केली असता, ती व्यक्ती २ वर्षांपूर्वी तेथे राहत असल्याची माहिती मिळाली. त्याच्या व्हॉट्सॲपबाबत मिळालेल्या माहितीवरून संशयितास अपना घर फेस २, विनय नगर, मीरा रोड पूर्व येथून ताब्यात घेऊन संशयिताकडे तपास केला. त्याच्या मोबाईलची पडताळणी केली असता, या व्यक्तीने तो प्रकार केल्याचे तपासामध्ये उघडकीस आले. या गुन्ह्यात आरोपी अभिषेक रविशंकर तिवारी (२६) व्यवसाय सिम कार्ड विक्री करत असून, त्यास अटक करण्यात आली आहे. अर्नाळा पोलीस ठाणे येथे पुढील तपास सुरू आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशाप्रकारे फसवणुकीचा प्रकार आपल्यासोबत घडलेला असल्यास तत्काळ नजीकच्या पोलीस ठाणे किंवा सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा असे आव्हान पोलिसांनी केले आहे.

पुढारी पु. पा नं. २

# ३३ लाखांचा मुद्देमाल नागरिकांना परत

**मिरारोड :** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ हद्दीमधील नालासोपारा, अर्नाळा पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांतील हस्तगत केलेला ३३ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल पिडीत व फिर्यादी तक्रारदार यांना परत करण्यात आला आहे. पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर तसेच चोरी व घरफोडीसारख्या गुन्ह्यांची पोलीसांनी कौशल्यपूर्वक उकल करून फिर्यादी यांचा आरोपीनी चोरून नेलेल्या किंमती वस्तू, गहाळ झालेले मोबाईल हॅन्डसेट असा मुद्देमाल तपासादरम्यान हस्तगत करण्यात आला होता. नालासोपारा पोलीस ठाणे येथे घेण्यात आलेल्या मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान पिडीतांना हस्तगत मुद्देमालामध्ये सोन्याचे दागिने, मोटर सायकल, मोबाईल फोन व गृहउपयोगी वस्तु पोलीसांनी कायदेशीर बाबींची पूर्तता करून परत दिल्या आहेत. पिडीत व फिर्यादींना त्यांच्या वस्तू परत मिळाल्याने त्यांनी पोलीसांचे आभार मानले.

CamScanner

# 'मुद्देमाल स्थानांतरण कार्यक्रम' के तहत नागरिकों को लौटाया गया सामान, चेहरे पर खुशी की लहर

अजहर शेख : संवाददाता

वसई : मीरा-भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत परिमंडल 3 के पेल्हार, विरार, मांडवी, नालासोपारा व अर्नाला पुलिस स्टेशन में दर्ज विभिन्न मामलो से पीड़ित नागरिकों का सामान जप्त कर उन्हे लौटाया गया है, जिससे नागरिकों के चेहरे पर खुशी की लहर देखने को मिला। पुलिस द्वारा किए गए इस सराहनीय कार्य की नागरिकों ने जमकर प्रसंशा भी की है।जानकारी के अनुसार नालासोपारा व विरार पुलिस स्टेशन में 'मुद्देमाल स्थानांतरण कार्यक्रम' आयोजित किया गया, जिसमें नालासोपारा, विरार पुलिस स्टेशन के अलावा पेल्हार, मांडवी व अर्नाला पुलिस स्टेशन के अधिकारी भी मौजूद रहे। बता दे,इस कार्यक्रम में 5 पुलिस स्टेशनों में दर्ज विभिन्न मामलो के आरोपितों से सामान जप्त कर नागरिकों को वापस किया गया। बताया गया है कि विभिन्न मामलो से कुल 83 लाख 75 हजार 484 रुपए कीमत का रिकवरी किया हुआ सामान नागरिकों में बांटा गया है। पुलिस के मुताबिक, थाने में दर्ज चोरी व सेंधमारी जैसे गंभीर व संगीन अपराधों को पुलिस ने कुशलता से सुलझाया तथा अपराध की विवेचना के दौरान आरोपियों के पास से चोरी या जबरन लूटा गया कीमती सामान और खोया हुआ मोबाइल हैंडसेट आदि बरामद किया गया, वही सामान नागरिकों को पुलिस अधिकारियों के हाथो सुपुर्द कर दिया गया। विरार पुलिस स्टेशन में दर्ज कई अपराधों एवं गुमशुदा संपत्ति के सामानों की कुशलता से जांच कर 28 मामलो को सुलझाया गया है। उक्त अपराध में आरोपियों के पास से कुल 32 लाख 81 हजार 79 रुपए की कीमत का सोने चांदी के आभूषण, मोबाइल फोन, कार टेप,दुपहिया/चौपहिया वाहन, मोटरसाइकिलें बरामद कर पीड़ित नागरिकों को वापस किया गया हैं। इस प्रकार विरार पुलिस में दर्ज अन्य कई



मोबाइल के मामलो में से 23 मोबाइल फोन भी जप्त किया गया है, जिसकी कीमत 3 लाख 68 हजार 999 रुपए बताया गया है, जो कि हकदार नागरिकों तक पहुंचा दिया गया। कुल मिलकर विरार पुलिस स्टेशन की तरफ से 36 लाख 50 हजार 78 रुपए का माल वरिष्ठ पुलिस निरीक्षक राजेंद्र कांबले के हाथो वापस किया गया हैं। पेल्हार पुलिस स्टेशन भी दर्ज मामलो पर सफलता हासिल करने में काफी आगे है, पुलिस टीम ने दर्ज 20 मामलों की गुत्थी सुलझाई है जिसमें 12 लापता मोबाइल का मामला भी शामिल है। पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे ने अपने हाथो से पीड़ित नागरिकों का सामान वापस कर उनके चेहरे खुशी से भर दिए। पेल्हार पुलिस स्टेशन की तरफ से नागरिकों में कुल 13 लाख 13 हजार 600 रुपए कीमत का सामान लौटाया गया है। विरार व पेल्हार पुलिस स्टेशन की सफलता को देखते हुए मांडवी, नालासोपारा व अर्नाला पुलिस स्टेशन की पुलिस भी कर्तव्य निभाने में कम नहीं है, मांडवी पुलिस स्टेशन में दर्ज विभिन्न मामलो का निराकरण कर आरोपियों से जब्त की हुई संपत्ति पीड़ितों को वापस किया गया। बता दे कुल 5 अपराधों का निराकरण कर अभियुक्तों के पास से एक लाख एक हजार 896 रुपए कीमत का माल जब्त हकदार नागरिकों तक पहुंचाया गया। वही नालासोपारा, अर्नाला पुलिस थानों में दर्ज विभिन्न अपराधों से बरामद कुल 33,00,000 रुपये का मूल्य पीड़ित और फिर्यादी/शिकायतकर्ता को वापस कर दिया गया है.उक्त कार्यक्रम में पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय के आदेश और परिमंडल 3 के पुलिस उपायुक्त सुहास बावचे के मार्गदर्शन पर विरार विभाग के सहायक पुलिस आयुक्त रामचंद्र देशमुख व नालासोपारा विभाग के एसीपी चंद्रकांत जाधव की देखरेख में पीड़ित नागरिकों को उनका सामान वापस किया गया। मौके पर पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे, विरार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक राजेंद्र कांबले, मांडवी पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस प्रफुल्ल वाघ, नालासोपारा पुलिस स्टेशन के पी.आई विलास सुपे व अर्नाला थाने के पी.आई कल्याणराव करपे आदि उपस्थित रहे।

CamScanner

DD 9 राज्य, 18 संस्करण मुंबई, पुणे, जयपुर, नई दिल्ली, इंदौर, भोपाल, सागर, उज्जैन, जबलपुर, ग्वालियर, रतलाम, रायपुर, बिलासपुर, दुर्ग, लखनऊ, जालंधर, रांची, कोलकाता से एक साथ प्रकाशित | मूल्य ₹ 5.00

दैनिक दबंग दुनिया

मुंबई, शुक्रवार, 12 मई 2023

निष्पक्ष नजर, निष्पक्ष खबर

देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अखबार

**सुविचार**

जिस तरह सोच समझकर बोलना एक कला है तो मौन रहना भी किसी साधना से कम नहीं।

**अंदर पढ़ें**



नालासोपारा,अनार्ला, पेल्हार,मांडवी और विरार पुलिस स्टेशन में दर्ज विभिन्न मामलों से

# संपत्ति रिकवरी कर पीड़ितों को दिया गया वापस

**दबंग रिपोर्टर » विरार**

मीरा-भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत परिमंडल 3 के पेल्हार,विरार, मांडवी,नालासोपारा व अनार्ला पुलिस स्टेशन में दर्ज विभिन्न मामलो से पीड़ित नागरिकों का सामान जप्त कर उन्हे लौटाया गया है, जिससे नागरिकों के चेहरे पर खुशी की लहर देखने को मिला। पुलिस द्वारा किए गए इस सराहनीय कार्य की नागरिकों ने जमकर प्रसंशा भी की है। जानकारी के अनुसार नालासोपारा व विरार पुलिस स्टेशन में मुद्देमाल स्थानांतरण कार्यक्रम आयोजित किया गया, जिसमें नालासोपारा,विरार पुलिस स्टेशन के अलावा पेल्हार,मांडवी व अनार्ला पुलिस स्टेशन के अधिकारी भी मौजूद रहे।बता दे,इस कार्यक्रम में 5 पुलिस स्टेशनों में दर्ज विभिन्न मामलो के आरोपितों से सामान जप्त कर नागरिकों को वापस किया गया। बताया गया है कि विभिन्न मामलो से कुल 83 लाख 75 हजार 484 रुपए कीमत का रिकवरी किया हुआ सामान नागरिकों में बांटा गया है। पुलिस के मुताबिक,थाने में दर्ज चोरी व सेंधमारी जैसे गंभीर व संगीन अपराधों को पुलिस ने कुशलता से सुलझाया तथा अपराध की विवेचना के दौरान आरोपियों के पास से चोरी या जबरन लूटा गया कीमती सामान और खोया हुआ मोबाइल हैंडसेट आदि बरामद किया गया,वही सामान नागरिकों को पुलिस अधिकारियों के हाथो सुपुर्द कर दिया गया।

## कई मामलो में मिली सफलता

विरार पुलिस स्टेशन में दर्ज कई अपराधों एवं गुमशुदा संपत्ति के सामानों की कुशलता से जांच कर 28 मामलों को सुलझाया गया है। उक्त अपराध में आरोपियों के पास से कुल 32 लाख 81 हजार 79 रुपए की कीमत का सोने चांदी के आभूषण, मोबाइल फोन, कार टेप,दुपहिया/चौपहिया वाहन, मोटरसाइकिलें बरामद कर पीड़ित नागरिकों को वापस किया गया हैं। इस प्रकार विरार पुलिस में दर्ज अन्य कई मोबाइल के मामलो में से 23 मोबाइल फोन भी जप्त किया गया है,जिसकी कीमत 3 लाख 68 हजार 999 रुपए बताया गया है,जो कि हकदार नागरिकों तक पहुंचा दिया गया। कुल मिलकर विरार पुलिस स्टेशन की तरफ से 36 लाख 50 हजार 78 रुपए का माल वरिष्ठ पुलिस निरीक्षक राजेंद्र कांबले के हाथो वापस किया गया हैं।

## 20 मामलों की गुत्थी सुलझाई

पेल्हार पुलिस स्टेशन भी दर्ज मामलो पर सफलता हासिल करने में काफी आगे है, पुलिस टीम ने दर्ज 20 मामलों की गुत्थी सुलझाई है जिसमें 12 लापता मोबाइल का मामला भी शामिल है। पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे ने अपने हाथो से पीड़ित नागरिकों का सामान वापस कर उनके चेहरे खुशी से भर दिए। पेल्हार पुलिस स्टेशन की तरफ से नागरिकों में कुल 13 लाख 13 हजार 600 रुपए कीमत का सामान लौटाया गया है।

## इनके आदेश व मार्गदर्शन में अधिकारी मौजूद

उक्त कार्यक्रम में पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय के आदेश और परिमंडल 3 के पुलिस उपायुक्त सुहास बावचे के मार्गदर्शन पर विरार विभाग के सहायक पुलिस आयुक्त रामचंद्र देशमुख व नालासोपारा विभाग के एसीपी चंद्रकांत जाधव की देखरेख में पीड़ित नागरिकों को उनका सामान वापस किया गया। मौके पर पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे, विरार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक राजेंद्र कांबले,मांडवी पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस प्रफुल्ल वाघ,नालासोपारा पुलिस स्टेशन के पी.आई विलास सुपे व अनार्ला थाने के पी.आई कल्याणराव करपे आदि उपस्थित रहे।









## 3 पुलिस स्टेशनों का कार्य रहा प्रशंसनीय

विरार व पेल्हार पुलिस स्टेशन की सफलता को देखते हुए मांडवी,नालासोपारा व अनार्ला पुलिस स्टेशन की पुलिस भी कर्तव्य निभाने में कम नहीं है, मांडवी पुलिस स्टेशन में दर्ज विभिन्न मामलो का निराकरण कर आरोपियों से जब्त की हुई संपत्ति पीड़ितों को वापस किया गया। बता दे कुल 5 अपराधों का निराकरण कर अभियुक्तों के पास से एक लाख एक हजार 896 रुपए कीमत का माल जब्त हकदार नागरिकों तक पहुंचाया गया।वही नालासोपारा,अनार्ला पुलिस थानों में दर्ज विभिन्न अपराधों से बरामद कुल 33,00,000 रुपये का मूल्य पीड़ित और फिर्यादी/शिकायतकर्ता को वापस कर दिया गया है।

CamScanner

# मीरारोड पूर्व में हुई हत्या में ६ वर्ष से फरार आरोपी चढ़ा पुलिस के हत्थे आयुक्त मधुकर पांडे को मिली बड़ी सफलता

मिरा रोड/अनिरुद्ध मिश्रा। दिनांक ११.०७.२०१६ मृतक का नाम सचिन नारायण मोहिते उम्र - २५ निवासी १ बी १०६ पाटलिपुत्र कॉम्प्लेक्स आनंद नगर जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई आरोपी १)सत्य कुमार भागीरथी पाणिग्रही उर्फ धीरेन कुमार पिल्ले उर्फ कुमार २)संदीप पोपट कुंभार ३)कपिल प्रभाकर जाधव ४) सत्यम जगबंधु बारिक उर्फ बाबू ५) अब्दुल हुसैन खान उर्फ चांद और उसके साथी ६) सुधीर प्रभाकर शुक्ला ७) अमीर गुलाम रसूल शेख उर्फ अम्मू ८) सैयद जाफर हुसैन जाफर हुसैन रिजवी ९) मो रशिद मोहम्मद सफीक कुरैशी और १० आरोपी (प्रमोद जैना उर्फ नीलू) ११) सौम्य राज खिरोद दास ने आपस में मिलीभगत कर पूर्व में लिए गए ३१ लाख रुपये न लौटाने से नाराज होकर मृतक सचिन नारायण मोहिते का अपहरण कर लिया और उसे मुंबई के गोरेगांव स्थित आरोपी सत्य कुमार पाणिग्रही के कार्यालय ले गए और मारपीट की तत्पश्चात आरोपी सत्यकुमार पाणिग्रही ने सचिन नारायण मोहिते को मीरा रोड ईस्ट, काशीमीरा स्थित आरके प्रीमियम होटल लाजिंग के कमरे में लाकर लात-घूसों से पेट व शरीर के अंतरंग हिस्सों पर पिटाई की जिससे उसकी जगह पर मृत्यु हो गई। सबूत नष्ट करने की मंशा से पालघर जिले के मनोर में अपनी टोयोटा कोरोला कार में डालकर सूर्या नदी के पुल से बह रही पानी की धारा में फेंक दिया। शव बरामद होने पर मनोर पुलिस स्टेशन में अज्ञात शव बरामद के तहत संख्या १४/२०१६ C.R.P.C. १७४ के रूप में अर्जी दायर किया गया था। संजय देवराम निकुम्बे, पुलिस निरीक्षक, अपराध अन्वेषण शाखा कक्ष-३, गु. आ. वी.एन.एम जोशी मार्ग, मुंबई पुलिस बल से प्राप्त जानकारी के आधार पर यह पाया गया कि उपरोक्त आरोपी ने पैसे के लालच में उक्त अपराध को अंजाम दिया. उसके द्वारा दी गई शिकायत के आधार पर उपरोक्त आरोपी के खिलाफ थाने में मामला दर्ज किया गया था. मामला पंजीकरण संख्या ००/२०१७ के अनुसार मनोर थाना, जिला पालघर में मामला दर्ज कर चूंकि अपराध स्थल काशीमीरा थाने की सीमा के भीतर है, उक्त अपराध काशीमीरा थाने में दर्ज किया गया था. और मामला काशीमीरा पुलिस थाने में दर्ज किया गया था स्टेशन नंबर ६६/२०१७धारा। टी वी क्रमांक धारा ३०२.३६४.३६४(ए) ३६५२०१२४२१७००२२५०६.३४ दिनांक १२.०२.२०१७ को प्रातः ५.५१ बजे, उपरोक्त अभियुक्त क्रमांक १ से ९) अपराध में गिरफ्तार कर न्यायालय में उनके विरुद्ध आरोप पत्र प्रस्तुत किया गया। अपराध में वांछित अभियुक्त प्रमोद जैना उर्फ नीलू एवं सौम्य राज दास अपराध के घटित होने के ०६ वर्ष से वांछित थे।आरोपी सौम्य राज दास उम्र (२७) वर्ष निवास रूम नंबर १३०२ डी विंग एवार ग्रीन टॉवर, रुस्तमजी ग्लोबल सिटी विरार पश्चिम वसई जिला पालघर मूल गांव बालिपी पोस्ट बालीकुंडा जिला जगत सिंह पुर राज्य उड़ीसा, ग्लोबल सिटी ओल्ड विवा कॉलेज विरार पश्चिम जैसा कि यह पाया गया कि वह यहाँ था, उसे तुरंत हिरासत में लिया गया था और उक्त अपराध में उसकी संलिप्तता थी ऐसा सिद्ध हुआ और उसे १०.०५.२०२३ को गिरफ्तार कर लिया गया। यह कार्यवाही आयुक्त मधुकर पाण्डेय, श्रीकांत पाठक अपर पुलिस आयुक्त, जयंत बजबले उपायुक्त पुलिस सर्कल १.के मार्गदर्शन में विजयक नरले सहायक पुलिस आयुक्त मुख्यालय, विलास सानप सहायक पुलिस आयुक्त मीरा रोड प्रमंडल, वरिष्ठ पुलिस निरीक्षक काशीमीरा पुलिस थाने संदीप कदम सहायक पुलिस निरीक्षक प्रशांत गांगुर्डे, नीलेश शिंदे, राहुल सोनकांबले, रवींद्र कांबले, धनश्री गूल डामले ने किया।

CamScanner

# Man duped with fake VIP SIM cards, 1 held

**MUMBAI:** The cybercrime unit attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have arrested a 26-year-old man from Mira Road who monetised the craze of people for the very important person (VIP) mobile numbers.

Action followed in response to a complaint registered by Ghanshyam Singh, who was duped of Rs64,000 by a man offering four VIP numbers for a premium. In his complaint, Singh, who runs a money transfer business, stated that he received the offer on a WhatsApp group and ended up paying to various digital wallet accounts specified by the suspect.

**SURESH GOLANI**

CS CamScanner

# Man held 7 years after killing colleague

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

After evading the police dragnet for nearly seven years, a 27-year-old man landed in the custody of the Kashimira police on Wednesday for his alleged involvement in kidnapping and murdering a colleague in 2016. The crime is said to be fall out of a dispute over Rs39 lakh.

According to the police, they had received the body of Sachin Mohite near Manor in Palghar. Investigations had led to the involvement of eleven people who had abducted Sanjay and accosted him to an office in Goregaon and later to a hotel in Kashimira where he was brutally assaulted leading to his death. The accused, in a bid to destroy evidence, dumped Sachin's body in the Surya River in Manor.

While nine people were arrested earlier and two Pramod Jena alias Nilu and Saumyaraj Das were absconding. Das, a resident of Balisahi village of Jagatsighapur in Odisha, was held with the help of electronic surveillance from the Global City. The hunt to arrest the eleventh and last accused is on, police said.

CamScanner

सामना

# पुलिस का पब्लिक को तोहफा

## पीड़ितों को लौटाया चोरों से बरामद लाखों का माल

**राधेश्याम सिंह / वसई**

मीरा-भायंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत परिमंडल ३ के पेल्हार, विरार, मांडवी, नालासोपारा व अर्नाला पुलिस थानों की हद में चोरों का शिकार बने पीड़ितों को कल पुलिस ने बड़ा तोहफा दिया। पुलिस ने पीड़ितों को चोरों से बरामद किया गया माल वापस लौटा दिया, जिससे नागरिकों के चेहरे पर खुशी की लहर देखने को मिली। पुलिस द्वारा किए गए इस सराहनीय कार्य की नागरिकों ने जमकर प्रसंशा भी की है।



मिली जानकारी के अनुसार, नालासोपारा, विरार पुलिस स्टेशन में 'मुद्देमाल वितरण कार्यक्रम' आयोजित किया गया, जिसमें नालासोपारा, विरार पुलिस स्टेशन के अलावा पेल्हार, मांडवी व अर्नाला पुलिस स्टेशन के अधिकारी भी मौजूद रहे। इस कार्यक्रम में ५ पुलिस स्टेशनों में दर्ज विभिन्न मामलों के आरोपितों से सामान जप्त कर नागरिकों को वापस किया गया। पुलिस के मुताबिक, विभिन्न थानों में दर्ज चोरी, लूट, छिनैती व सेंधमारी जैसे गंभीर मामलों को पुलिस ने अपनी सूझ-बूझ एवं मेहनत से सुलझाया तथा अपराध की विवेचना के दौरान आरोपियों के पास से बरामद चोरी-लूट आदि लगभग ८३ लाख ७५ हजार ४८४ रुपए का कीमती सामान व मोबाइल फोन आदि नागरिकों को पुलिस अधिकारियों के हाथों वापस लौटाया गया। उक्त कार्यक्रम में पुलिस आयुक्त मधुकर पांडेय के आदेश और परिमंडल ३ के पुलिस उपायुक्त सुहास बावचे के मार्गदर्शन पर विरार विभाग के सहायक पुलिस आयुक्त रामचंद्र देशमुख व नालासोपारा विभाग के एसीपी चंद्रकांत जाधव की देखरेख में पीड़ित नागरिकों को उनका सामान वापस किया गया। इस मौके पर पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे, विरार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक राजेंद्र कांबले, मांडवी पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक प्रफुल्ल वाघ, नालासोपारा पुलिस स्टेशन के पीआई विलास सुपे व अर्नाला थाने के पीआई कल्याणराव करपे आदि उपस्थित रहे।

Hindi Saamana Edition
May 12, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com

CS CamScanner